# पूर्णमिदं

Volume I Issue 3
May -June 2019

**Poornam Ecovision Foundation**

Survey no 5, 'Matoshree' bungalow,

Chinmay colony, Janseva Medical

Lane, Cummins College Road,

Karvenagar, Pune-52

E-mail:

contact@poornamecovision.org

Contact: 7722077447

सादर नमस्कार!

नुकताच ५ जून रोजी आपण 'पर्यावरण दिवस' साजरा केला. या दिवसाच्या पार्श्वभूमीवर आपल्या हाती हा अंक देत आहोत. पर्यावरण दिवसानिमित्त आपण निरनिराळे उपक्रम राबविले असतीलच. त्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन! तसेच आपणा सर्वांची वाटचाल 'पर्यावरणपूरक जीवनपद्धती' कडे लवकरात लवकर होवो हि इच्छा आम्ही व्यक्त करतो.

मागील अंकातील डॉ. राहुल मुंगीकर यांच्या 'ग्रामविकास व जैवविविधता' या लेखाचा पुढील भाग पुढील भाग तसेच शाश्वततेसाठी संसाधनांचा विभागून/ मिळून वापराबाबत श्री कपिल सहस्त्रबध्दे यांचा माहितीपूर्ण लेख या अंकात देत आहोत. या लेखावरील प्रतिक्रिया, सूचनांचे नक्कीच स्वागत होईल.

गेल्या दोन-तीन महिन्यात आपल्या राज्यावर असणारे 'जलसंकट' हा प्रशासनासह सर्वांच्या काळजीचा भाग झाला आहे. थोड्याश्या उशिराने आलेल्या पावसाने ही समस्या अजून तीव्रतेने लांबवली. स्वाभाविकपणे जनमानसाच्या तोंडी जलसंकट, त्यावरील तात्पुरते उपाय, याची चर्चा ऐकू येत होती. परंतु पुरेशा प्रमाणात पाऊस झाला आणि आपण यावर विचार करणे थांबवले. परंतु या समस्येवर मुलभूत उपाय शोधायचा असल्यास कायमस्वरूपी कृतीशील कार्यक्रम राबविण्याची गरज वाटते. आपल्या देशाचे मा. पंतप्रधान सुद्धा आपल्या 'मन की बात' मध्ये जलसाक्षरता आणि जलसंवर्धन चळवळीसाठी देशाला प्रेरित करतात. गेल्या ४-५ वर्षांपासून 'जलयुक्त शिवार' बरोबरच 'नाम' आणि 'पाणी फाउंडेशन' सारख्या योजना यावर कार्यरत आहेत. परंतु शहरामध्ये अधिक परिणामकारकतेने हे उपाय राबविण्याची गरज आहे.

विकेंद्रीकृत प्रकल्पांतर्गत इमारतीचे पर्जन्यजल व्यवस्थापन करण्याचे प्रयत्न गेल्या ३ वर्षांपासून 'पूर्णम' करते आहे. याचाच विस्तार म्हणून आपण यावर्षी अधिकाधिक प्रमाणात पर्जन्यजल व्यवस्थापन करण्याचा प्रयत्न करत आहोत. हा उपक्रम राबविण्यासाठी सीएसआरच्या माध्यमातून कमिन्स इंडिया फाउंडेशनने निधी सुद्धा उपलब्ध करून दिला आहे. आपण आपल्या इमारतींमध्ये पर्जन्यजल व्यवस्थापन करून स्वयंसेवक म्हणून या प्रकल्पास हातभार लावावा असे आवाहन पूर्णम यानिमित्ताने करत आहे.

विकेंद्रीकृत (इमारत पातळीवर) कचरा व्यवस्थापन व पर्जन्यजल व्यवस्थापन याद्वारे आपली इमारत पर्यावरणपूरक

करूयाच, त्याबरोबरच महापालिकेमार्फत मिळकत करात सूट मिळणाऱ्या योजनेचे लाभार्थी सुद्धा होऊयात. आपणासर्वांच्या निर्धारासाठी आपल्याला पूर्णमचा सक्रीय पाठिंबा राहील याची आम्ही खात्री देतो.

धन्यवाद.



*डॉ. राजेश मणेरीकर,*

*मुख्य कार्यकारी अधिकारी,*

*पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन.*

*9922055851*

*ceo@poornamecovision.org*

## Insides:


| | |
|---|---|
| संपादकीय | 1 |
| शाश्वततेच्या दिशेने प्रवास | 2 |
| Bimonthly Report | 3 |
| लोकसहभागातून जैवविविधता संरक्षण व ग्रामविकास (लेखांक २) | 4 |

# संसाधनांचा मिळून वापर ठरेल शाश्वततेच्या दिशेने प्रवास

तुम्हाला सांगितलं कि काही गावात खाजगी विहिरींचा वापर लोक गटाने करत आहेत, त्यासाठी शेती कामाच्या वेळा ठरवत आहेत, एकमेकाला मदत करत आहेत, तर तुमची पहिली प्रतिक्रिया काय असेल? बहुतेक जण यावर विश्वासच ठेवणार नाहीत. कारण असं पटकन दिसून येत नाही कुठे, मग कुठे घडलंय असं? आपल्याच राज्यात, नंदुरबार या एकदम उत्तरेच्या जिल्ह्यात आजही हे सुरु आहे.

२००७ साली नंदुरबार येथील डॉ हेडगेवार सेवा समिती ने खांडबारा परिसरातील ८ गावात ग्राम विकासाची कामे सुरु केली. कामांचे स्वरूप साधारण ग्रामविकासात जी कामे करतात तसेच होते. पाणी व्यवस्थापन हा एक महत्वाचा मुद्दा या सगळ्यांत होता. जमिनीवरचं पाणी आणि खालचं पाणी, दोन्हीचे व्यवस्थापन गरजेचे होते.

विहीर हे सिंचनाचे प्रमुख साधन या परिसरात होते. पण उपलब्ध विहिरीच्या मर्यादा होत्या. दुसर पीक घ्यायला पाणी कमी पडतं असं इथल्या शेतकऱ्यांचे म्हणणे होते. तांत्रिक अभ्यासात असं दिसून आलं ही या भागातील भूजलाची सर्वसाधारण पातळी ही आताच्या विहिरींच्या पेक्षा ९ ते 12 फुट खाली आहे. विहिरी खोल केल्याच तर पाण्याचे शाश्वत स्त्रोत मिळू शकतात आणि किमान दोन पिके निश्चित घेता येतील. तांत्रिक दृष्ट्या हा एकदमच सोपा पर्याय होता. पण लोकांना विविध कारणामुळे ते शक्य नव्हतं.

पण संसाधनांची विपुलता आली कि हव्यास वाढतो किंवा आळस. विकासाच्या चक्रात ही वेळ कधीतरी येतेच. आणि मग शाश्वततेची परिमाणं ढासळू लागतात. त्यामुळे कामाच्या सुरुवाती पासूनच विचार केला तर नवीन प्रश्न निर्माण होण्याची शक्यता कमी होते. त्यामुळे संस्थेने हा विचार प्रथम पासूनच केला. पंडीत दीनदयाळ उपाध्यायांच्या 'एकात्म मानव दर्शनातील' सूत्रे पण याचेच सुतोवाच करत होत्या. संसाधनांचा सामूहिक व डोळस वापर हे त्यांनी सांगितलेले सूत्र इथे कामाला आले.

संस्थेने शेतकऱ्यांसमोर प्रस्ताव ठेवला कि विहिरी खोल करण्यासाठी आम्ही मदत उभारू पण तुम्ही सुद्धा आजूबाजूच्या ५ शेतकऱ्याना पाणी दिलं पाहिजे. सुरुवातीचे अनेक महिने तर याचीच चर्चा, हे होईल का, आमचं पाणी, तुमचं पाणी यात गेले.

सरते शेवटी काही शेतकरी प्रयोगाला तयार झाले. मग काय, सुरुवातीच्या टप्प्यात 4 विहिरी खोल करून ५ शेतकऱ्यांनी पाणी वापरायला सुरुवात केली. सगळ्या शेतकऱ्यांनी सुद्धा आर्थिक सहभाग दिला.

पाणी कसं वापरायच, प्रत्येकाला किती मिळेल, सर्वांनी लाईट बिल साठी पैसे गोळा करायचे, आकडे टाकून लाईट घ्यायची नाही, बँकेत खातं काढायचं अशा १०० उपगोष्टी जोडल्या जाऊ लागल्या. काही शेतकऱ्यांनी सुचवल्या, काही संस्थेकडून आल्या. या सहभागी पाणी वापराचे परिणाम दिसायला लागले. प्रत्येकाला दोन पिके तर मिळालीच पण थोडा भाजीपाला पण मिळाला ज्यातून पैसे सुद्धा मिळायला लागले.

बघता बघता हा प्रवास ५० हून अधिक विहिरींपर्यंत येऊन पोचला आहे. शेतकऱ्यांनी त्यांचा आर्थिक सहभाग वाढवला आहे. हे करताना कोणाला घ्यायचं, कोणाला थोडं थांबायला सांगायचं, सहभाग जमा करण्याची पद्धत, जबाबदारी हे काम पण स्थानिकांनी केलं. यासाठी या गावांची मिळून एक परिसर सेवा समिती तयार झाली. राजकारणाला बाजूला ठेऊन फक्त समाजकारणाची चर्चा, निर्णय तिथे होऊ लागले. यातीलच एक महत्वाचा निर्णय म्हणजे जास्त पाणी लागणारे पिके उदा. उस लावायचा नाही. बराच अवघड असलेला निर्णय लोकांनी सहमतीने घेतला. यात वाद झाले, भांडणे झाली, अनेक गोष्टी झाल्या पण लोकांनी विषय लावून धरला. संस्थेने पण त्यांच्या कडून प्रयत्न सुरु ठेवले. यातून हा महत्वाचा निर्णय होऊ शकला. लोकांना आर्थिक सक्षमता यावी म्हणून संस्थेने बियाणे निर्मिती,

भाजीपाला लागवड, मधुमक्षिका पालन, फळझाडे कार्यक्रम सुरु केले. लोकांच्या १०-४० % सहभागातून हे कार्यक्रम यशस्वी पणे साकार झाले.

शाश्वतता ही जीवन शैलीचा, जगण्याचा भाग आहे. ती फक्त चर्चा व दुसऱ्या कुणी करण्याचा भाग नाही. खाजगी विहिरींच्या सामुहिक वापरातून 'अशिक्षित' समजल्या जाणाऱ्या जनजाती लोकांनी एक मार्ग दाखवून दिला आहे. तो कंटकाकीर्ण आहे. पण तोच शाश्वततेकडे नेणारा आहे. आपण त्यावर चालायची हिंमत दाखवतो का नाही यावरच आपलं भवितव्य अवलंबून आहे.




*कपिल सहस्रबुद्धे,*

*योजक, पुणे.*

*9822882011.*

*kapil.sahasrabuddhe@gmail.com*

# Bimonthly Report

***Fabric Upcycling***

The fabric waste is also the part of waste which remains unnoticed and unmanaged most of the time. PEF collects this waste and upcycle it to different fashionable products. PEF worked with 2 SHGs in these months for manufacturing. Total production was 151 units. Number of stalls arranged for product promotion is 14.

***E-waste and Plastic Waste***

Poornam collects E-waste and plastic waste from Pune citizens through drives and centers, which is then either given to refurbish or donated to needy organizations. With 36 drives and 18 collection centers in Pune, we collected 4380 kg of E-waste and 1036 kg of Plastic waste in the months of May and June. 12 CPUs, 1 laptop and 1 UPS were donated to three organizations. Total recycled waste weighs up to 1805kg.

***Solid Waste Management Project, Waluj***

At Waluj MIDC, Aurangabad, Poornam provides technical support to Mahindra's Solid Waste Management Project, which includes running systematic segregated waste collection procedure. Though the project is in its initial stage, Poornam has succeeded in creating awareness among people about systematic waste collection. We can see this in the increase in waste collection month by month. The residential waste collection increased by 84% and industrial waste by 29%.

***Green Consultancy***

Poornam provides consultancy for better management of water sources and wet waste disposal at society level. Total 4 composting and 1 rainwater harvesting projects are continued in these two months.

***Sanitary Napkins Manufacturing and Disposal Project***

We also work in the field of manufacturing (Phaltan, Satara) and disposal of sanitary napkins. At its own manufacturing unit, Poornam produced about 5148 sanitary napkins. The sale of 65 packets containing 8 napkins each is recorded. Also, at disposal center, 7700 napkins are safely disposed. In ward no. 34, at 45 collection points 7700 sanitary napkins are collected with 6 awareness programs clearing the doubts about sanitary waste.

***Awareness Initiatives***

Poornam arranges awareness sessions specially for children and women in slum to educate them about different topics. For this two months, we arranged awareness sessions with the central theme of general sanitation, health and hygiene in association with Sevasahayog at Padmavati and Vanshiv. Also, training was conducted by Poornam for teachers and coordinators of Sevasahayog. Total 55 women and 80 children participated in 11 awareness sessions, 3 of which were arranged by Sevasahayog.



Promotion of products at stalls



E-waste and Plastica waste collected at center



Sanitary Napkins Manufacturing



Awareness session for women

# लोकसहभागातून जैवविविधता संरक्षण व ग्रामविकास

*जैवविविधता आपल्या शहराचा, गावांचा अविभाज्य भाग आहे. परंतु विकासाची अधिकाधिक हाव व त्यासाठी अवलंबिलेले अशाश्वत, अनियोजित मार्ग ह्यामुळे निसर्गाच्या मूलभूत घटकाला च हानी पोहचत आहे. म्हणूनच  जैवविविधतेवर कसा परिणाम करतात व त्याच्या संरक्षण व संवर्धनासाठीचे कायदेशीर, लोकसहभागधारित उपाय ह्या लेखमालिकेतून आम्ही आपल्या समोर मांडत आहोत.*

लेखांक २ -

अनिर्बंध चराई, खाणकाम व शेतजमिनीवर हेतुतः लावलेल्या आगी या सर्वांचे परिणाम केवळ पाण्यापुरते मर्यादित आहेत असे नाही तर त्याचे अन्यही अनेक परिणाम दिसून येतात.

**1) पशुधन व त्यांचे आरोग्य:** गावातील पशुधनाच्या विकासाकरिता आवश्यक असणारे सकस गवत हे उपलब्धच होत नाही. याचा परिणाम म्हणजे शेतकरी बाहेरून गवत, कुट्टी आणून जनावरांना देतो. यामुळे खर्चामध्ये सतत वाढ होत राहते.

**2) पाण्याची उपलब्धता:** जमिनीतील पाणी मुरण्याचे प्रमाण कमी झाले की पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवायला लागते. याचा परिणाम शेतीवर तर होतोच परंतु याचबरोबर याचा परिणाम हा अन्य किटक-पक्षी यांच्यावरही होत असतो. शेतीचे उत्पादन मूल्य घटत जाते व शेवटी शेती डबघाईस आल्याचे जाणवते. यामुळे विहिरी,

ओढे, नद्या यातील पाण्याची पातळी कमी कमी होत जाते. त्याचा परिणाम नदीत किंवा ओढ्यामध्ये असणारे मासे, खेकडे यांसारख्या आपल्या अन्नांस उपयुक्त अशा घटकांवर होत जातो. त्यांचे प्रमाण लक्षणीयरित्या घटलेले दिसून येते.

**3) महत्वपूर्ण जैविक घटक:** माळरान किंवा गुरचराई क्षेत्रातून गवत कमी कमी होत गेल्यास त्या भागातील किटक व त्यावर अवलंबून असणारे पक्षी तसेच अन्य घटक यांच्यावर होत असतो. पक्षांचे नैसर्गिकपणे कीड नियंत्रण व माधामाश्यांसारख्या जीवांचा शेतीतील परागीभवनाच्या प्रक्रियेत अत्यंत मोलाचे स्थान आहे. परंतु हे दोन्ही घटक नष्ट होत गेल्यास त्याचा थेट परिणाम हा शेतीच्या उत्पादनावर होताना दिसून येतो. यामुळे शेतकरी याकरिता रासायनिक औषधे व तंत्रज्ञान वापरण्याचा प्रयत्न करतो व त्यामुळे पुन्हा खर्चात वाढ होत राहते.

**4) औषधी वनस्पती व त्याचा वापर:** आपल्या राज्यातील अनेक गावे हि औषधी वनस्पतींनी अगदी नटलेली आहेत. परंतु कोणत्याही प्रकारच्या नियंत्रणाखेरीज त्याचा व्यावसायिक वापराकरिता प्रचंड तोड होत आहे. याची पद्धत म्हणजे कोणीतरी व्यापारी गावात येऊन जातो व तो काही लोकांना अशा वनस्पती गोळा करायला सांगतो.

त्याचा पुढे काय वापर करणार आहे हे गावातील लोकांना कधीही लक्षात येत नाही व सर्वस्वी फायदा हा त्या व्यापाऱ्याचा होतो. अशा अनिर्बंध तोडीनंतर काही वनस्पती तर कायमच्या नष्ट होत चाललेल्या आहेत व याचे भविष्यातील परिणाम गंभीर आहेत. याचाच दुसरा परिणाम असा आहे कि शेतीसाठी उपयुक्त असणाऱ्या जनावरांना त्यांच्या दुध वाढीकरिता यातील काही वनस्पती किंवा गवत हे आवश्यक असते. परंतु ते योग्य काळी व वेळी उपलब्ध ना झाल्याने त्याचा परिणाम आपल्या जनावरांच्या पुढे वाढणार्या वंशावर होत राहतो. यामुळे वंशामध्ये भाकडपणाचे प्रमाण अधिक दिसून येते.

**5) रानभाजी:** याशिवाय सध्या सर्वत्र दिसून येत असलेला सर्रास प्रकार म्हणजे रानभाजी स्पर्धा होय. खरेतर संवर्धनाच्या मूळ हेतूने प्रेरित झालेली हि बाब सध्या शहरी लोकांच्या आग्रहास बळी पडल्याने, त्याचे व्यावसायिकीकरण होत आहे. या प्रकारच्या कार्यक्रमांमुळे ज्या रानभाज्या गावातील २०-२५ घरांतील भुकेचा प्रश्न मिटवीत होत्या त्या शहरातील ४००-५०० लोकांच्या जेवणाकरिता गोळा करण्यास सुरुवात झालेली आहे. हे करीत असताना लोकांच्या परंपरागत ज्ञानाची नोंद कुठेही ठेवली जात नसल्याने या माहितीच्या आधारे शहरातील तथाकथित तज्ञ मंडळी स्वतःच्या नावाने अशी माहिती प्रकाशित करीत आहेत. याचा फायदा भविष्यामध्ये या तज्ञ लोकांपुरताच मर्यादित राहतो. शिवाय स्थानिक ठिकाणी भाज्या गोळा करण्याचे प्रमाण हे वाढत असल्याने पुढील ४-५ वर्षांमध्ये त्यांचे अस्तित्व धोक्यात येणार हे निश्चित.

**6) तापमान बदल व शेती:** गेल्या दोन दशकांपासून पाऊस, ऊन, वारा, तापमान व आर्द्रता या घटकांमधील अनियमितता सातत्याने वाढत आहे. याचा थेट परिणाम हा शेती तसेच शेती-निगडीत अन्य उत्पादनांवर होत आहे. खरेतर स्थानिक ठिकाणच्या जैवविविधतेमध्ये निसर्गात होत असलेल्या बदलांना तोंड देण्याची क्षमता ही नैसर्गिकपणे विकसित होत असते. यातील बदल हे सूक्ष्मपणे पुढे येत असतात. जैवविविधतेकडे होत असलेल्या दुर्लक्ष्यामुळे या महत्वपूर्ण विषयाकडे लक्ष द्यायचे असते हे स्थानिक लोकांना माहितीच नाही. जर बदलत्या काळाबरोबर शेतकऱ्यांनी योग्य पाऊले उचलली नाहीत तर भविष्यामध्ये शेती उत्पादनावर अनिष्ट परिणाम होणार हे निश्चित.

(क्रमशः)

*डॉ. राहुल मुंगीकर,*

*सहाय्यक संचालक (पॉलिसी सेल),*

*बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटी, मुंबई.*

*9822611128*

*r.mungikar@bnhs.org*